Lalita Gandbhir
4200 North Ocean Dr.
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
OneTime Serial Rights

# एका अपघाताची कथा

दोन दिवस अन् रात्र पाऊस पडत होता. रोमाच्या डाक बंगल्यावजा पाच खोल्यांच्या घराभोवतालची डोंगराई हिरवीगार झाली होती. अंगणातली गवताची हिरवळ भाताच्या शेतासारखी चिखलावरच तरंगत होती. त्यावर चालायचा प्रयत्न केला तर पाय बुटासकट चिखलात रुतत होते. झाडांच्या बुंध्यावर, सिमेंटच्या कुंपणावर एवढंच काय डांबरी रस्त्याच्या कडेलाही शेवाळ्याचं लिंपण माजलं होतं. सगळ्या सृष्टीवरच कुणा रंगाऱ्याने अलगद कुंचला फिरवून ती हिरवी करून टाकलीय अशीही कल्पना रोमाच्या मनांत येऊन गेली.

ह्या दोन पावसाळी कुंद दिवसात रोमाला तिचा एकटेपणा तीव्रतेने जाणवत होता. सौरभची उणीव भासत होती. मधून मधून "सैन्यातील ऑफिसरशी लग्न केलं ही महाचूक झाली." अशी भावनाही मनात स्पर्श करत होती.

"सारखा फिरतीवर असणार तो. तुला कुठेतरी लांबलांबच्या अनोळखी प्रदेशात एकटं राहावं लागेल. रोमा ह्या क्षणी तुला तारतम्य उरलं नाहीय. पण विचार कर नातेवाईक मित्रमैत्रिणी सगळे पार दूर राहातील. तू एकटी पडशील."

रोमाचं लग्न ठरण्याआधी आईने पुन्हा पुन्हा ही सूचना उगाळली होती. आपल्या भावी जीवनाचा आईने रेखाटलेला तो चित्रपट बघून सारासार विचार करून निर्णय घेण्याच्या मनःस्थितीत रोमा तेव्हां नव्हती.

ती सौरभच्या प्रेमात पडली होती. त्याचं बोलणं, हसणं, उंची, मर्दानी देखणेपण यांनी तिला भारून टाकलं होतं.

"व्यवहारी पातळीवर येऊन आपल्या प्रेमाची परिक्षा कशी करायची ? खऱ्या प्रेमात अशा क्षुद्र अडचणीवर मात करण्याची शक्ती असली पाहिजे." तिची विचारशक्ती ह्या स्वनाळू, भावपूर्ण उंबरठ्यालाच ओलांडत नव्हती.

अजूनही सौरभ जवळ असला की त्याचं तिच्यावरचं अन् तिचं त्याच्यावरचं प्रेम सर्व अडचणीवर मात करायचं पण तो नसला की पश्चाताप, निराशा, विरह, स्वतःच्या एकटेपणाविषयी वाटणारी दया, अशा अनेक भावना तिला छळत राहायच्या.

गेल्यावर्षी सौरभची बदली भारताच्या उत्तर सरहद्दीवर असणाऱ्या ह्या आर्मी कॅम्पमध्ये झाली होती. अगदी जंगली, निर्जन विभागात तो कॅम्प होता. तिथे फक्त सैनिकांना, ऑफिसर्सना व त्यांच्या नोकराना राहायची व्यवस्था होती. कॅम्पपासून शंभर मैलावर एक लहानसं, खेड्यापेक्षा मोठं, तालुकावजा पारंज नावाचं गाव होतं. त्या गावात आर्मीने सहा लहान बंगले बांधले होते. त्यात ऑफिसर्सची इच्छा असल्यास त्याच्या कुटुंबाला राहण्याची

व्यवस्था केली जात असे. गेलं वर्षभर रोमा तिथल्या एका बंगल्यात राहात होती. इतर पाच बंगल्यातूनही तिच्यासारख्याच नवीन लग्न झालेल्या बायका होत्या. दोघींना लहान मुलं होती, गावात चौथीपर्यंतच शाळा होती. त्यामुळे मुलं चौथी पास झाली की बायकांना आपलं बस्तान पारंज्याहून हलवावंच लागे.

खडकाळ, डोंगरातल्या घाटातून वळणावळणाने जाणारा ओबडधोबड रस्ता हा पारंज व आर्मी कॅम्प ह्याना जोडणारा एकमेव दुवा होता. पाऊस, वाटेतील झऱ्यांना पूर, चिखल, डोंगरावरील खडकांचे अपघात इत्यादी अनेक कारणांनी तो दुवा वर्षातून अनेकदा तुटायचा. आर्मी कॅम्पजवळून वळणावळणाने येणारी आगगाडी त्या रस्त्यावरून चालणाऱ्या माणसाला किंवा मोटारच्या ड्रायव्हरला कधीच दिसत नसे. धुळीमुळे किंवा थंडीपावसामुळे मोटारच्या खिडक्यांच्या काचा बंद ठेवल्यास आगगाडीचा खडखडाटही ती अगदी जवळ आल्याशिवाय ऐकू येत नसे. कार व आगगाडी यांचे अपघात टाळण्यासाठी कॅम्पमधल्या सर्वांना गाडीच्या येण्याजाण्याच्या वेळांची दर दोन आठवड्यांनी आठवणही करून दिली जात असे. बऱ्याच वर्षापूर्वी आगगाडीचा व जीपचा मोठा अपघात झाला होता म्हणून ही सूचना दिली जायची अशीही कॅम्पमध्ये वदंता होती.

कॅम्पमधून रोज सकाळी एक मोठी जीप पारंज्याला येण्यासाठी निघायची. त्यातून पत्र, सटर-फटर सामान व पारंज्याला येणाऱ्या जाणाऱ्या माणसांची वाहतूक व्हायची. कुटुंबवाले ऑफिसर ह्या जीपमधून न चुकता दर दोन आठवड्यानी पारंज्याला यायचे. हल्ली पारंजाला कुणी पाश्चात्य धर्तीचं रेस्टॉरंट उघडलं होतं. त्यात मजा करायला म्हणून इतर ऑफिसरही यायचे. ही ऑफिसर स्पेशल बहुधा शुक्रवारी यायची. भल्या पहाटे निघून पारंजाला पोचताना त्यांना रात्रीचे आठ सहज वाजायचे.

आज चार पावसाळी दिवसानंतर शुक्रवारी सकाळी रोमाला सूर्यदर्शन झालं. “रात्री सौरभ येणार” ती मनात म्हणाली.

“सौरभ येणार म्हणूनच सूर्यही आनंदला. त्याने आज दर्शन दिलं.” असा काव्यपूर्ण विचारही तिच्या मनात येऊन गेला.

आज रात्रीसाठी तिने व शेजारच्या बंगल्यातल्या सविताने जेवणाचा खास बेत केला होता. त्या जेवणाची तयारी त्या दोघींना सकाळपासून करायची होती. सहाही बंगल्यातल्या सर्व बायका-मुलांना व त्यांच्या ऑफिसर नवऱ्यांना दोघींना जेवायचं आमंत्रण दिलं होतं.

त्या शुक्रवारी सकाळी रोमाच्या मनावर गेले चार दिवस आलेलं मळभ पावसाबरोबरच नाहीसं झालं. ती उत्साहाने आंघोळीला गेली.

खरं म्हटलं तर स्वयंपाक करण्याची आवश्यकता दोघींनाही नव्हती. सर्वच ऑफिसरांच्या घरी स्वयंपाक करणाऱ्या बायका होत्या. पारंजातली गरीब माणसं घरकामाला आनंदाने येत असत. शिवाय प्रत्येकीच्या घरी बाजारहाट करायला गडीही होता. पण सविताला अगदी सुरवातीपासून सगळं स्वतः करायची हौस होती. आज बाजारातही त्या दोघी स्वतःच जाणार होत्या. सविता स्वतःच्या नजरेखालून घालून दोन कोंबड्या व इतर सामान विकत घेणार होती. त्यासाठी त्यांची सामुदायिक जीपही दोघींनी सकाळी मागवली होती.

बंगल्यातल्या सहा ऑफिसर्सना मिळून मिलिटरीतर्फे एक जीप व ड्रायव्हर मिळाला होता. मुलांना शाळेत पोचवणं, परत आणणं, येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांना पन्नास मैलावर असणाऱ्या स्टेशनवर पोचवणं इत्यादी काम ती जीप करत असे. ह्याच जीपने आज सविता व रोमा बाजारात जाणार होत्या.

संध्याकाळी सात वाजताच स्वयंपाक तयार झाला. सर्व ऑफिसर्सची कुटुंबं सविताच्या घरी जमली. आज सर्व बायका नवरा येणार ह्या अपेक्षेने नखरा करून आल्या होत्या. सगळेच आतुरतेने “ऑफिसर स्पेशलची” वाट पहात होते.

आठ वाजता दूरून जीपचे दिवे दिसले . सगळीजण आतुरतेने अंगणात येऊन उभी राहिली. मुलं पुढे धावू लागली. आया त्यांना मागे खेचू लागल्या.

ऑफिसर स्पेशल सहा बंगल्याच्या मधल्या मोकळ्या जागेत येऊन उभी राहिली. सगळे उतारू उड्या मारून बाहेर पडले. त्यांचा नूर पहाताच सर्वच बायकांच्या लक्षात आलं की आज काही बिघडलं आहे. नेहमीप्रमाणे सगळे हसत खिदळत विनोद करत नव्हते. सर्वांचेच चेहरे गंभीर होते. सगळेजण एक कोंडाळ करून रेंगाळत बायकांच्या दिशेने चालू लागले. तो कंपू जवळ येताच रोमाच्या लक्षात आलं की त्यात सौरभ नाही. तिच्या घशाला कोरड पडली. मन घट्ट करून “वाईट बातमी नसू दे” अशी ती प्रार्थना करू लागली.

अखेर शेवटी सर्वात सिनियर ऑफिसर रामजीत सिंग पुढे झाले. त्यांनी रोमाला दंडाला धरून बाजूला बोलावलं. “काल रात्री सौरभला अपघात झाला. त्याची मोटर स्कूटर चिखलात घसरली. त्याचा हात मोडला आहे. अर्थात ते एवढं धोक्याचं नाही. पण… पण…

हे ऐकताच रोमा आपला विरह, मिलिटरीतल्या ऑफिसरशी लग्न केल्याचा पश्चाताप सगळं काही विसरली. उरलं फक्त सौरभ वरचं प्रेम अन् त्याच्या अपघाताविषयी वाटणारी तीव्र काळजी.

“पण काय खरं ते सांगा” रोमा सर्व धीर एकवटून म्हणाली.

“पण त्याला हेड इनज्युरी आहे. अशी शंका आहे. तो आम्ही निघेपर्यंत शुद्धीवर आला नव्हता.” रोमाच्या पाठीवर थोपटत रामजीत म्हणाले.

“तसं काळजी करण्याचं कारण नाही. आमच्या कॅम्पवर आधुनिक लहान हॉस्पिटल आहे. आमचे डॉ. रामन अगदी हुशार आहेत. त्यांना पंधरा वर्षाचा अनुभव आहे. त्यांनी रात्रीच डोक्याच्या हाडाचे एक्सरे काढलेत. डोक्याच्या हाडांचे फ्रॅक्चर नाहीय मेंदूला मुका मार लागून रक्तस्राव झाला असण्याची शक्यता आहे म्हणून काल रात्रीच त्यानी मेडिकल हेलिकॉप्टर पाठवण्यासाठी दिल्लीला तार केलीय. सकाळी आम्ही निघेपर्यंत उत्तर नव्हतं. उद्या सकाळपर्यंत हेलिकॉप्टर येईल बहुधा. सौरभला दिल्लीच्या हॉस्पिटलमध्ये पाठवण्याचा विचार होता. अर्थात हे सगळं तो शुद्धीवर आला नसला तरच. तो शुद्धीवर आला तर सगळाच प्रश्न सुटेल. तशी त्याची नाडी अगदी व्यवस्थित चाललीय म्हणून डॉक्टर म्हणत होते.”

रोमा स्तब्ध उभो होती. “मला… मला… तो शुद्धीवर आला तर कळायचा मार्ग काय ?” तिने विचारलं.

“डॉक्टर लगेच तार करतो म्हणाले होते.” रामजीतने आश्वासन दिलं.

“अजून तार आली नाही… म्हणजे सौरभ अजून शुद्धीवर आला नाही.” रोमा अर्धवट स्वतःशी अर्धवट रामजीतला म्हणाली.

“येईल येईल तार. उद्या सकाळपर्यंत येईल. पुष्कळदा कनेक्शन मिळत नाही.” रामजीतने आशा दाखवायचा प्रयत्न केला.

रोमाने मन घट्ट केलं. “चला तुम्हाला भूक लागली असेल. आपण जेऊन घेऊ या.” ती सगळ्यांनाच उद्देशून कुणाकडेही न बघता म्हणाली.

मुकाट्याने जेवण पार पडलं. जेवल्याबरोबर रोमा आपल्या बंगालीत परत गेली. फोनची उणीव तिला आज तीव्रतेने भासली.

“उद्या सकाळी सौरभला हेलिकॉप्टरने हलवणार. त्याला हलवला की नाही समजायलाच मला दोन दिवस लागतील. हलवला असला तर इथून दिल्लीला पोचायला आणखी दोन दिवस, कदाचित तो मला जिवंत भेटणारही नाही परत. काही झालं तरी आज रात्री मला त्यांच्या मिलिटरी कॅम्पवरती पोचायला हवं पण जाणार कसं ?”

रोमाने उठून बाहेर दृष्टीखेप टाकला. सामुदायिक जीप नेहमीप्रमाणे सहा बंगल्याच्या आवाराच्या बाहेर उभी होती.

रात्री पारंजाहून मिलिटरी कॅम्पला जाणं जवळ जवळ अशक्य होतं. रस्ता खाचखळग्यांचा होता. रस्त्यात जंगली जनावरांचा धोका होता. वाटेत जीप बिघडली तर मदत मिळण्याची आशा नव्हती. जीपचा गावातला ड्रायव्हर किंवा गावातले लोक भुताखेतांच्या व जंगली जनावरांच्या भीतीने रात्री घराबाहेरही पडत नसत, तेव्हा त्या ड्रायव्हरला विचारण्यात अर्थच नव्हता. रोमाला ऑफिसर्सपैकी कुणाला बरोबर येता कां म्हणून विचारावसही वाटलं. पण ते येण्याची शक्यता अगदी कमी होती. शिवाय आपल्या खातर ड्रायव्हरचा किंवा एखाद्या ऑफिसरचा जीव धोक्यात घालावा हेही रोमाला पटत नव्हतं. अकस्मात रोमाला रोहनची आठवण झाली.

रोहन हा मुळचा मिलिटरी ऑफिसर. पारंज्यातच राहायचा. “पाच वर्षापूर्वी त्याची तरुण बायको अनपेक्षित मृत्यू पावली होती. म्हणून तो वेडा झाला होता.” असं सगळे म्हणायचे. तसा रोहनच्या बोलण्या वागण्याचा वेडेपणाचा अंशही नव्हता. त्याला बघून हा वेडा असेल अशी शंकाही कुणाला आली नसती. पण त्याचं वागणं वेडेपणाचं होतं.

तो सारखा आपल्या बायकोची वाट बघत असायचा कधी ती जंगलात हरवली आहे असं म्हणायचा तर कधी ती बाजारात गेलीय असं सांगायचा. मधून मधून तो तिच्या शोधात सर्व बंगल्यावर चक्कर टाकायचा. कधी एकटाच जंगलातून मिलिटरी कॅम्पपर्यंत चालत जाऊन यायचा. रोमाच्या माहितीत रोहन हा असा एकच माणूस होता की ज्याला जंगलाची भीती नव्हती. दर शनिवारी रात्री तो बंगल्यावर ऑफिसर्सच्या पार्टीला हमखास येत असे. परंतु आज तो आला नव्हता. रोमाने आपल्या गड्याला हाक मारली. “किशनजी, रोहनसाबच्या घरी जाऊन त्याना बोलावून आणा.” तिने त्याला सांगितलं.

“बाईचं डोकंच फिरलय.” असा भाव गड्याच्या चेहेऱ्यावर उमटला. पण तो मुकाट्याने पारंज्याला जाऊन अर्ध्या तासात परत आला.

“रोहनसाब दोन दिवस गायब आहेत.” त्याने रोमाला सांगितलं. रोमापुढची शेवटची आशा खुंटली. आता रोमासमोर एकच मार्ग उरला होता.

रोमाने साडी सोडली व सलवार कमीज घातली. मनाचा धडा करून तिने खिडकीबाहेर पाहिलं. फक्त सविताच्या बंगलीत उजेड होता. सगळीजण अजून तिथेच होती. ती गड्याच्या खोलीत डोकावली. तो आरामात घोरत होता. हळूच मागच्या दाराने रोमा बाहेर पडली.

सामुदायिक जीपच्या किल्ल्या नेहमीसारख्या जीपमध्येच होत्या. त्या फिरवून तिने पेट्रोल किती आहे हे पाहिलं. नशिबाने पेट्रोल भरलेलं होतं. दिवे न लावता तिने जीप थोड्या अंतरावर नेली आणि मग भरधांव सोडली.

दिवसभराच्या सूर्यप्रकाशाने चिखल थोडा सुकला होता. पण खड्डे अजून पाण्याने भरल्याचे दिसत नव्हते. पारंज्याबाहेर पडताच दिव्याच्या प्रकाशात रस्त्या सभोवताली जंगली श्वापदं दिसू लागली.

दोनदा कोल्हे गाडीसमोरून पळत गेले, एकदा वाटेत रस्त्यावरच्या सशाला वाचवण्यासाठी रोमाने ब्रेक लावला. तो लावताना जीप घसरली. पण नंतर आपोआप स्टिअरिंग फिरून सरळ रस्त्यावर आली.

पुढे रोमाला वाटेतला एक खड्डा लांबून दिसला नाही. त्याच्या जवळ जाताच स्टिअरिंग आपोआप फिरलं गेलं आणि जीप खड्ड्याच्या भवतून गेली.

आता मात्र रोमाला आपल्या शेजारी कुणी आहे असा भास होऊ लागला. "एक दैवी शक्ती आपल्याला मदत करत आहे. ह्या कठीण मार्गावर आपल्याला सांभाळत आहे." रोमाने स्वतःची समजूत घातली.

का कोण जाणे रोमाला त्या अदृश्य शक्तीची भीती वाटली नाही. उलट तिच्या मनावरचा ताण कमी झाला. ती सौरभलाही विसरली आणि तन मन एकवटून जीप चालवत राहिली.

रोमा कॅम्पजवळ पोचली. तिने हातावरच्या घड्याळाकडे दृष्टीक्षेप टाकला सकाळचे दहा वाजत आले होते. कॅम्प आता कक्षात आला होता. रस्ताही डांबरी झाला होता. तिने पेट्रोल पेडलवरचा दाब वाढवला.

अकस्मात ब्रेक आपोआप दाबला गेला. रोमाने रस्त्यावर नजर फिरवली. रस्ता मोकळा होता. तिने दबलेल्या ब्रेककडे दुर्लक्ष करून जीपचा वेग वाढवण्यासाठी पेट्रोल पेडलवरचा दाब आणखी वाढवला आणि लगेच किंचाळून दात ओठ दाबून ब्रेक लावला.

कारण क्षणार्धापूर्वी मोकळ्या असणाऱ्या रस्त्यावर तिच्या जीपसमोर दोन्ही हात आडवे पसरून एक स्त्री उभी होती. निमिषार्धात तिचे लांब मोकळे कुरळे केस, भरीव लाल ओठ, रेखीव बांधा, काळे टप्पोरे डोळे, अपरं नाक, उंच बांधा अन निळी वाऱ्यात उडणारी साडी व फडफडणारा पदर रोमाच्या मनात चित्रासारखा ठसला. रोमाने अगदी दात ओठ खाऊन जोरात ब्रेक लावला तरी त्या स्त्रीला धक्का बसलाच आणि धक्का लागला तरी त्या स्त्रीने फक्त मंद स्मित केल्याचं रोमाच्या लक्षात आलं.

पुढे काय करणार ह्याचा विचार करण्याची रोमाला संधी मिळण्याआधीच अगदी जीप जवळून समोरच्या रुळावरून धडधडत पाच डब्यांची छोटी आगगाडी धावत आली व क्षणातच वळण घेत दूरच्या डोंगरात नाहीशी झाली.

आगगाडीच्या धडधडीने जीप व रोमा थरथरल्या. नाहीशा होणाऱ्या आगगाडीकडे बघत रोमा तटस्थ बसून राहिली. त्या बधीर परिस्थितीतून जाग येताच आपल्याला त्या बाईने मरताना वाचवलं ते तिला जाणवलं. पूर्ण शुद्धीत आल्यावर ती त्या बाईला शोधू लागली पण ती सुंदरी दिसेनाशी झाली होती. रोमा जीपमधून उडी मारून उतरली. तिने रुळावरून दोन्ही बाजूला दृष्टीक्षेप टाकला. मग झाडीकडे जाऊन हाका मारल्या पण तिला उत्तर मिळालं नाही.

"काही झालं तरी त्या बाईचा शोध लावायचा असा निर्धार करून रोमाने परत जीप सुरु केली. आणि ती सरळ हॉस्पिटलच्या आवारात येऊन थांबली. दोन वेळा स्वातंत्रदिनाच्या समारंभाला ती कॅम्पवर आली होती. म्हणून तिला हॉस्पिटल कुठे होतं हे ठाऊक होतं.

जीप दृष्टीस पडताच कॅम्पवरची माणसं धावत बाहेर येऊन आश्चर्याने बघत आहेत हेही तिच्या लक्षात आलं नाही. तिची सगळी विचारशक्ती आता सौरभवर केंद्रीत झाली होती.

हॉस्पिटलच्या आवारात ती थांबताच अनेक आश्चर्यचकीत चेहरे तिच्याभोवती उगवले.

"सौरभ इज ऑलराईट, यू ब्रेव्ह लेडी." कुणी तरी ओरडलं. ते ऐकताच तिच्या हातापायातलं उसनं अवसान गेलं आणि ती एकदम बेशुद्ध होऊन जमिनीवर धाडदिशी कोसळली.

रोमा शुद्धीवर आली तेव्हा हॉस्पिटलच्या बेडवरती झोपवलेली होती. सौरभ शेजारी खुर्चीवर बसला होता. त्याच्या हातावर प्लास्टर कास्ट लावला होता.

जवळच एक पांढऱ्या कपड्यातला माणूस उभा होता. इतरही पुरुष दरवाजातून डोकावत होती. तिच्याकडे बघत सौरभ हसला.

"तू… ठीक आहेस ना ?" तिने सौरभला विचारलं.

"कसा दिसतोय तुला मी ?" त्याने मिस्किलपणे विचारलं.

"म्हणजे हेड इनज्युरी ?" रोमाने कसेबसे शब्द उच्चारले.

"पारंज्याची जीप निघाल्यावर लगेच शुद्धीत आलो मी. त्या अपघाताने मला हेड इनज्युरी झाली नाही पण तुझ्या साहसाने आणि तुला रात्री काय झालं असतं ह्या विचाराने मात्र ब्रेन इनज्युरी व्हायची वेळ आलीय आता." सौरभने उत्तर दिलं.

"धीस इज कॉल्ड ट्र्यु लव्ह सौरभ. व्हॉट अ ब्रेव्ह वाईफ यू हॅव." एक मध्यमवयीन टेथॉस्कोप घातलेले गृहस्थ आत येत सौरभला म्हणाले "रात्रभर जीप चालवून दमल्याने चक्कर आली तिला. चहा येतोय तिच्यासाठी." त्यानी सौरभला सांगितलं.

"सगळे जवान तुमच्या धाडसाने आश्चर्यचकीत झालेत. तुम्ही जंगलातून एकट्या आलात ना म्हणून तुमचा सत्कार करण्याचा बेत करताहेत ते." डॉक्टर रोमाकडे कौतुकाने बघत म्हणाले.

"खरं सांगू ?" उठून बसत रोमा म्हणाली, "मी एकटी नव्हते. मला सारखा कुणीतरी माझ्याबरोबर होतं असा भास होत होता. स्टिअरिंग व्हिल आपोआप फिरत होतं."

"डॉक्टर, अतिश्रमाने आणि जागरणाने हिच्या डोक्यावर परिणाम झालाय." सौरभ डोळे विस्फारून रोमाकडे पहात उद्‌गारला. त्याच्याकडे दुर्लक्ष करत रोमा बोलत राहिली. "माझ्या जीपचा आगगाडीबरोबर अपघातच होणार होता. पण एका अतिशय सुंदर बाईने मला अपघातातून वाचवलं. स्वतःचा जीव धोक्यात घालून ती माझ्या जीपसमोर उभी राहिली अन् मला आगगाडी येण्याच्या वेळी अडवलं. मी जोरात ब्रेक लावून जीप थांबवली. तोच आगगाडी जीप समोरून धडधडत आली. जीपमध्ये आणि आगगाडीत सहा इंच सुद्धा अंतर नव्हते."

"डॉक्टर, खरच हिच्या डोक्यावर परिणाम झालाय." आता मात्र सौरभ खरोखरच काळजीत पडला होता.

"खरच सांगते. स्वतःच्या डोळ्याने बघितलं मी तिला. उंच, काळे डोळे, लांब कुरळे केस, अपरं नाक, लाल ओठ… फारच सुंदर होती ती."

सौरभ आ वासून रोमाकडे पहात होता.

"रोमा, कॅम्पमध्ये बायकाच नाहीत. अशा वर्णनाची बाई इथे असणं अशक्य आहे." सौरभ ठामपणे म्हणाला.

"खरंच सांगतेय मी सौरभ… स्वतःच्या डोळ्याने पाहिलय मी तिला."

एकमेकाशी वाद घालताना सौरभ-रोमाचं डॉक्टर रामनकडे लक्ष नव्हतं. ते फार गंभीर झाले होते.

“रोमा, तिचे कपडे बघितलेस तू ?” त्यांनी विचारलं.

“हो. निळ्या रंगाची साडी नेसली होती ती…” डॉक्टर एकदम खालीच बसले.

“गूढ आहे हे सगळं” ते स्वतःशीच बोलल्याप्रमाणे म्हणाले आणि मग स्वप्नात असल्याप्रमाणे बसून राहिले.

“काय ? काय गूढ ?” आता रोमा आणि सौरभ दोघंही एकदमच बोलले.

“सगळीच गोष्ट सांगतो.” डॉक्टर म्हणाले.

“रोहनला पाच वर्षापूर्वी इथेच मेनिनजायटीस झाला होता. तोही सौरभसारखा बेशुद्ध झाला होता. त्याची बायको गुलशन रोमासारखी बंगल्यात पारंजाला राहात होती. मी तिला ऑफिसरच्या जीपबरोबरच निरोप पाठवला होता. तीही एकटी रोमासारखीच जीपने इकडे यायला निघाली. पण वाटेत तिचा आणि आगगाडीचा अपघात झाला.”

“तिचा अपघात झाल्यावर तिला ह्याच हॉस्पिटलमध्ये आणली होती. तिची बॉडी रोहन शुद्धीवर येईल या आशेने ठेवली होती. पण रोहन अर्धवट शुद्धीत होता. शेवटी गुलशनच्या आईवडिलांनी तिला नेऊन अंत्यविधी करून टाकले.”

“रोहन पुढे बरा झाला पण त्याच्या मनावर परिणाम झाला. तुम्हाला ते ठाऊकच आहे.”

“रोमा गुलशनसारखी रात्री इकडे येण्याचा प्रयत्न करील या भीतीने मी सौरभ शुद्धीवर आल्यावर रोमाला लगेच तार पाठवण्याचा प्रयत्न केला.”

“मला ती तार मिळाली नाही.” रोमा म्हणाली.

“कनेक्शनच लागलं नाही.” डॉक्टर म्हणाले.

“गूढ हे की रोमाने वर्णन केलेल्या बाईसारखीच गुलशन दिसायला होती. एवढच नव्हे तर मला स्पष्ट आठवतय… ती निळी साडी नेसली होती.”

पुढे कुणी काही बोललं नाही. स्वप्नात असल्याप्रमाणे रोमा उद्गारली.

“शिवाय माझ्या जीपचा त्या स्त्रीला जोरात धक्का लागला होता. पण… पण… तिला काहीच झालं नाही.”

समाप्त

पूर्वप्रसिद्धी, वैनतेय दिवाळी व वर्षारंभ विशेषांक १९८७